


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २७ जून २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : २४२ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com

Editor : Dr. Vishwasrao Anandrao Arote | Registration no. MAHMAR/2021/82132 | Pages : 4 | Year : 3rd | Issue : 242 | Amount : 4 Rs/- | Gmail : punegavkari@gmail.com

## सिंहासन




# राज-उद्धव अखेर एकत्र : मराठी मोर्चात बंधूभेट

## ५ जुलैला दाखवणार ठाकरेंची ताकद : हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्रविरोधात ठाकरे बंधू मैदानात

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्रविरोधात ठाकरे बंधू मैदानात उतरले आहेत. जुलैच्या पहिल्या आठवड्यात ठाकरे बंधूंच्या मोर्चांनी महाराष्ट्र दणाणून निघणार आहे. राज ठाकरे पुरस्कृत मोर्चा 5 जुलैला तर 7 तारखेला उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मराठी समन्वय समितीचा एल्गार असणार आहे. ठाकरे बंधूंचे दोन वेगवेगळे मोर्चे एकाच दिवशी काढण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडूनही यासाठी हालचाली सुरु आहेत. तसेच वेगळा मोर्चा काढण्यासाठी 5 जुलैच्या मोर्च्यात सहभागी व्हावं, यासाठी प्रयत्न केले जात होते. यानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली आहे.




महाराष्ट्रातील शाळात हिंदीसक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी एक्स पोस्ट संजय राऊत यांनी केली आहे. त्यामुळे हिंदीसक्तीविरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याचं निश्चित झालं आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली होती. तसेच काल मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मुंबईमधील गिरगाव चौपाटी येथे भव्य मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. तर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे गटाने ७जुलै रोजी हिंदी सक्तीविरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केली होती.

मात्र मराठीच्या मुद्द्यावर दोन वेगवेगळे मोर्चे कशासाठी असा प्रश्न या घोषणांनंतर उपस्थित झाला होता. त्या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी आज सकाळी हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात एकत्रच मोर्चा काढण्यात येईल अशी घोषणा ट्विटच्या माध्यमातून केली. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित छायाचित्रासह केलेल्या या ट्विटमध्ये संजय राऊत यांनी महाराष्ट्रतील शाळांत हिंदी सक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल ! जय महाराष्ट्र!असे म्हटले आहे.

गेल्या काही काळापासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होत्या. तसेच दोन्ही भावांनीही एकत्र येण्याबाबत सकारात्मक संकेत दिले होते. आता मराठी भाषेच्या मुद्द्यावर आणि हिंदी सक्तीविरोधात निघणाऱ्या मोर्चामधून ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याने या माध्यमातून राज्याच्या राजकारणालाही मोठी कलाटणी मिळणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मला तर वाटतं, मराठी माणसाची एकत्र ताकद दिसणं गरजेचं आहे. राज ठाकरे यांनी काल आवाहन केलं होतं, त्याला समोरुन प्रतिसाद मिळाला. मराठी भाषेची गळचेपी आणि हिंदी भाषेची सक्ती आणि लादण्याचा प्रयत्न होतोय, त्याविरोधात मराठी माणसाने एकत्र येऊन आवाज उठवणे गरजेचे आहे. मराठी भाषा हा राजकीय मुद्दा नाही. मराठी भाषेपुढे कोणीही छोटं-मोठं नाही, सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे. यासाठी राज ठाकरे सकारात्मक आहेत, आम्ही सगळे सकारात्मक आहोत. 5 जुलै रोजी हा मोर्चा एकत्रितपणे निघेल, अशी माहिती मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी दिली आहे.

## थोडक्यात...



### मुश्रीफ यांना कायदेशीर दिलासा

**कोल्हापूर (समर्थ गांवकरी) :** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते हसन मुश्रीफ यांना संताजी घोरपडे सहकारी साखर कारखान्याशी संबंधित कथित शेअर घोटाळा प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुश्रीफ यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले होते. मात्र, आता न्यायाकडून त्यांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना शेअर्स देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याच्या आरोपावरुन हसन मुश्रीफ यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, कागलच्या कनिष्ठ न्यायालयात पोलिसांनी सी-समरी रिपोर्ट सादर केला असून, यामध्ये मुश्रीफ यांच्याविरोधात कोणताही पुरावा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. परिणामी, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या विरोधातील गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसंदर्भात दाखल याचिका निकाली काढली आणि अटक वा कारवाईस स्थगिती दिली आहे. हे प्रकरण किरीट सोमय्या यांनी पुढे आणले होते, आणि त्याच्या आधारेच ईडीनेही मनी लॉन्डरिंगचा तपास सुरू केला होता. मात्र, राज्य पोलिस तपासातून हसन मुश्रीफ यांच्यावर आरोप टिकू शकले नाहीत. त्यामुळे या निर्णयामुळे मुश्रीफ यांना कायदेशीर दिलासा मिळालाच आहे.

## ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे नीरा नदीतील पहिले पादुका स्नान

**सातारा : (समर्थ गांवकरी)**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज टाळ मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात मोठ्या आनंदाने आणि भक्तिमय वातावरणात सातारा जिल्ह्यात पाडेगाव येथे आगमन झाले. फडफडणाऱ्या भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर आणि हरिभजनात तल्लीन होऊन संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा भक्तीरसात चिंब न्हाऊन निघाला. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोबतच्या पादुकाचे नीरा नदीतील पहिले पादुका स्नान देखील आज संपन्न झाले. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होताच जिल्ह्याच्या वतीने पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खा. उदयनराजे भोसले, खा. नितीन पाटील, आ. सचिन पाटील, आ मनोज घोरपडे, माजी खा. रणजीतसिंह नाईक- निंबाळकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पूलकुंडवार, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन,



पोलीस अधीक्षक तुषार दोशी वाईचे प्रांतअधिकारी राजेंद्र कचरे यांनी पुष्प अर्पण करुन व पोलीस बँड पथकामार्फत विविध धून वाजून स्वागत केले. नीरा नदीतील स्नानानंतर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यातील पाडेगाव येथे मान्यवरांनी तसेच लाखो भाविकांनी दर्शन घेतले. माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांनी एकच गर्दी केली होती. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२५ निमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी गावनिहाय सुविधा माहिती व लोकेशन मार्गदर्शनाचा क्यूआर कोड https://smartpanchayat.in/palakhi/ पंचायत समिती खंडाळा व फलटण यांनी उत्कृष्ट पद्धतीने पहिल्यांदाच तयार केला आहे.

## सर्व विसरून कोणी एकत्र येत असेल तर केव्हाही चांगलेच

### राज-उद्धव ठाकरेंच्या युतीवर शरद पवारांची प्रतिक्रिया : हिंदी सक्तीलाही विरोध

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

सर्व विसरून कोणी एकत्र येत असेल तर केव्हाही चांगले आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्यावर त्यांना पत्रकाराने प्रश्न विचारला होता. कोल्हापूर दौऱ्यावर असताना त्यांनी हे विधान केले आहे. राज्य सरकारच्या वतीने करण्यात येत असलेल्या हिंदी सक्तीला देखील त्यांनी विरोध दर्शवला.

शिवसेना आणि मनसे एकत्र आले तर चांगलेच आहे. मात्र येतील का नाही? हे सांगायला मी ज्योतिषी नाही, असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. आणि संजय राऊत एकत्र येण्याचे सांगत आहे. त्यामुळे आणखीन चांगले, असे खोचक उत्तर शरद पवार यांनी दिले आहे.



कोणी एकत्र येऊन, सर्व विसरून काही करत असतील, तर ती गोष्ट केव्हाही चांगली. दोन भावांमध्ये मतभेद असतील आणि मतभेद विसरून एकत्र काम करण्याचे त्यांनी ठरवले तर नाराज होण्याचे काही कारण नाही. असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. काका-पुतण्याच्या प्रश्नावर मात्र, त्यांनी हसून उत्तर देणे टाळले आहे.

या वेळी हिंदी सक्तीच्या विरोधाला देखील त्यांनी पाठिंबा दिला. सरकारने पहिली ते चौथी पर्यंत हिंदी सक्तीची करण्याचा आग्रह सोडावा. पाचवीपासून हिंदी शिकवण्यास काहीही हरकत नसल्याचे ते म्हणाले. मात्र, या मुद्यावर राज ठाकरे यांच्या इशाऱ्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. कोण-कोण मोर्चाला येतो, हे मी बघतो, ही भाषा चांगली नाही, अशा शब्दात शरद पवार यांनी राज ठाकरे यांची कान टोचले आहे. सचिन तेंडुलकर यांचे क्रिकेटमध्ये योगदान आहे. क्रिकेट संबंधी काही निर्णय घ्यायचा असेल तर त्यांचे मत विचारात घेतले जावे. मात्र हा विषय त्यांचा नाही. त्यामुळे या विषयावर त्याचे मत विचारात घेतलेच पाहिजे, असे काही नाही. अशा शब्दात शरद पवार यांनी राज ठाकरे यांना सुनावले आहे.

पहिली ते चौथी प्राथमिक विभाग असतात. हिंदी सक्ती तिथे करणे योग्य नाही. पाचवी ते पुढील वर्गासाठी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून हिंदी शिकवणे योग्य असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

आज देशात 55 टक्के लोक हिंदी बोलतात. दुसरी कोणतीच भाषा एवढ्या मोठ्या प्रमाणात बोलणारे नाहीत. म्हणून हिंदीला दुर्लक्षित करून चालणार नाही. साधारणतः महाराष्ट्रामध्ये लोक हिंदीच्या विरोधात नाहीत. मात्र पहिली ते चौथी विद्यार्थ्यांच्या डोक्यावर एकदम नवीन भाषा आत्ताच लादणे योग्य नाही. तिथे मातृभाषा ही महत्त्वाची असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात मी उद्धव ठाकरे यांचे स्टेटमेंट देखील वाचले आहे. मुंबईला गेल्यावर त्यांचे म्हणणे देखील समजून घेईल. त्यांनी कार्यक्रम देखील जाहीर केला आहे. इतर राजकीय पक्षांनी सहभागी होण्याचे आवाहन देखील त्यांनी केला आहे. त्या कार्यक्रमास सहभागी व्हायचे असेल तर नक्की धोरण काय? हे समजून घ्यावे लागेल, असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. कोणीही सांगतो आणि त्याच्या मोर्चात सहभागी होणार, असे होणार नाही. त्यांची भूमिका समजून घ्यावी लागेल.

जर त्यांचा मुद्दा महत्त्वाचा असेल तर नक्कीच मोर्चा सहभागी होणार असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. राज ठाकरे यांनी काल दिलेल्या आव्हानच्या प्रश्नावर त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

# भंडारदरा धरण ५०% भरले

## घाटघर परिसरात सतंतधार पाऊस!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

भंडारादरा धरण पाणलोट क्षेत्रात पावसा वेग वाढल्याने आज धरण ५० टक्के भरले आहे. निळवंडे धरणात पाणीसाठा जलद वाढण्यास मदत होत आहे. निळवंडे धरणाचा पाणीसाठा ४३ टक्क्यांवर पोहचला. पाऊस असाच सुरू राहीला तर ही दोन्ही धरण जुलै अखेर पूर्ण क्षमतेने भरतील, असा विश्वास आदिवासी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

मुळा नदीवरील अंबित १९१ दलघफूट सर्वप्रथम व तद्रंतर पिंपळगाव खांड प्रकल्प ६०० दलघफूट , कोथळे १८३ दलघफूट शिरपुंजे १५५ दलघफूट असलेले धरण ओव्हर फ्लो झाले. तर कृष्णावंती नदीवरील वाकी जलाशय १०२ दलघफूट व प्रवरा नदीला मिळणाऱ्या टिटवी शिवारातील ३०३ दलघफूट क्षमतेचे टिटवी लघुबंधारा पुर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाल्याने ओसंडून वाहत आहे. हे पाणी पुढे प्रवरेवरील निळवंडे धरणात येत असून या धरणात नवीन पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे.

गुरुवार सकाळी ६ वाजता भंडारदरा धरणाचा पाणीसाठ ५४२१ दलघफूटवर झाला. गुरुवारी सकाळी ६ वाजता संपलेल्या २४ तासांत भंडारदऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस मिलिमीटरमधे असा आहे. कंसात या पावसाळ्यात झालेला एकूण पाऊस आहे. घाटघर 89 रतनवाडी 101, भंडारदरा 75 पांजरे 78 सुमारे एक आठवड्यापासून घाटघर, रतनवाडी, साम्रद, पांजरे या भंडारदऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातून मुसळधार पाऊस कोसळत असून शेतकऱ्यांचे भात आवणीस लवकरच वेग येणार आहे. धरण पाणीसाठा मध्ये झपाट्याने वाढ असल्याने शाखा अभियंता प्रवीण भांगरे, वसंत भालेराव लक्ष ठेऊन आहे.



# नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडेंचा ब्राझील अभ्यास दौरा यशस्वी

## कामगार व संचालक मंडळाकडून भव्य सन्मान

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांचा दहा दिवसानंतरचा ब्राझील देशाचा अभ्यास पूर्ण दौरा यशस्वी झाल्यानंतर नागवडे कारखाना कार्यस्थळावर नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांचा सभासद कामगार व संचालक मंडळाकडून भव्य असा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस हे होते.

व्यासपीठावर कारखान्याचे जेष्ठ संचालक सुभाषराव शिंदे; विश्वनाथ गिरमकर; सावता हिरवे; बंडू जगताप; लक्ष्मण रायकर; प्रशांत दरेकर; राकेश पाचपुते; डी आर काकडे; दत्तात्रय कातोरे; ज्ञानदेव खरात; शरद जगताप; आदेश नागवडे कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांच्यासह सर्व संचालक मंडळ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रस्ताविकात ज्येष्ठ संचालक सुभाषराव शिंदे यावेळी बोलताना म्हणाले की; सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे बापूंच्या नंतर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी सक्षमपणे सहकारी साखर कारखानदारी चालवली. सभोवताली अनेक खाजगी कारखान्यांची स्पर्धा उभी असताना राजेंद्र दादा नागवडे यांच्या खंबीर नेतृत्वामुळे या कारखान्याची यशस्वीपणे वाटचाल सुरू आहे. ब्राझीलच्या अभ्यास दौऱ्यातून श्री नागवडे यांचे निश्चितपणे साखर



कारखानदारी व शेतकऱ्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन लाभणार असल्याचे सांगितले. कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस यावेळी म्हणाले की; महाराष्ट्रमध्ये अनेक सहकारी साखर कारखाने आहेत. त्यातून सहकाराचे गाढे अभ्यासक राजेंद्र दादा नागवडे यांची निवड ही अभिमानास्पद ठरली आहे. राजेंद्र नागवडे यांनी बापूंच्या पावलावर पाऊल ठेवून ही सहकारी साखर कारखानदारी उत्तम प्रकारे चालवली. असे सांगून ते पुढे म्हणाले की; साखर कारखान्याबाबत सहकार महर्षी बापूंची जी भावना होती. तीच भावना राजेंद्र नागवडे यांची आहे. आपल्या कुटुंबापेक्षाही नागवडे कुटुंबांनी या साखर कारखानदारीवर जीवापाड प्रेम ठेवले. म्हणूनच आज अनेकांचे प्रपंच फुलले आहेत. या अभ्यास दौऱ्यातून साखर कारखाना व सभासदांची मोठी भरभराट होईल; अशी अपेक्षा श्री भोस यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी कारखान्याचे नवनिर्वाचित तज्ञ संचालक दत्तात्रय कातोरे; ज्ञानदेव खरात यांच्यासह तीन सेवानिवृत्त साखर कामगारांचा सन्मान यावेळी राजेंद्र नागवडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यावेळी म्हणाले की; नॅशनल फेडरेशनच्या वतीने ब्राझील अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली. या देशामध्ये गेल्यानंतर अनेक बाबी समजून घेता आल्या. त्यातून काम करण्याची संधी व प्रेरणा मिळते. ब्राझील दौरा हा 22 तासाचा ठरला. असे सांगून नागवडे आणखी पुढे म्हणाले की; ब्राझील देशात भौगोलिक आणि नैसर्गिक वातावरणात मोठा अमुलाग्र बदल दिसून आला. या देशांमध्ये एका शेतकऱ्याकडे कमीत कमी 25 ते 30 हेक्टर जमीन असून; शेती ही पूर्णतः यांत्रिकी व आधुनिक पद्धतीने दिसून आली. तेथे फक्त पावसावर शेतीची वाटचाल आहे. विहिरी; कुपनलिका; विजेवर चालणारी विद्युतपंप; व कालवा नाही. त्यामुळे तेथे पावसावरची शेती ही येथील शेतकऱ्यांना वरदान ठरलेली दिसून आली. ब्राझीलमध्ये ऊस; सोयाबीन ही पिके जास्त प्रमाणात आहेत. येथील जमीन ही चांगली सुपीक आहे. या देशात शंभर टक्के ऊस शेतीचे उत्पादन दिसून आले. तेथील शेतकऱ्यांचे बारा महिने काम चालू आहे. महाराष्ट्रातील कारखाने व ब्राझीलमधील कारखान्यांमध्ये अत्यंत मोठा बदल आहे. पावसावर ऊस शेती असल्यामुळे ऊसाची रिकवरी मोठ्या प्रमाणावर मिळते. त्यातून भरघोस उत्पन्न देखील मिळते. तेथील शेतकरी सूक्ष्मपणे शेती करतात. त्यामुळे ब्राझील देश हा प्रगतशील देश गणला जात आहे. या देशात इथेनॉलचा जास्त वापर असल्यामुळे तेथील कुठेही प्रदूषण होत नाही. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे आरोग्य ही उत्तम प्रकारे दिसून आले. याबरोबरच त्या देशातील अनेक बाबी ह्या डोळ्याचे पारणे फेडावे अशा प्रकारे दिसून आल्या. या अभ्यास दौऱ्यातून निश्चित प्रकारे साखर कारखान्याला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्याबरोबरच पुढील गाळप हंगामात दररोज सात हजार मे. टनाने साखर कारखाना चालेल यासाठी प्रयत्न करू. यासाठी साखर कारखाना कामगारांचेही सहकार्य आवश्यक असल्याचे श्री नागवडे यांनी सांगून अभ्यास दौऱ्यानिमित्त सन्मान केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले

यावेळी उपस्थित सभासद कामगार कार्यकर्ते व हितचिंतकांचे कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नेटके यांनी आभार मानले.

---

## संपादकीय



### 'मुत्सद्दी मध्यस्थ'

जेव्हा संघर्ष उद्भवतो तेव्हा मुत्सद्दी म्हणून मिरवण्यासाठी पुढारी लगेच धावतात; श्रेय मिळवणे हा हेतूही असतोच. 'भारत पाकिस्तानचे युद्ध मीच थांबवले', असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट सांगितले, तेव्हा एकच सन्नाटा पसरला. ट्रम्प यांचे हे दिवास्वप्न मोडण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ३५ मिनिटे खर्ची घालावी लागली असे कळते.

'१९७२ च्या सिमला करारानुसार उभय देशांच्या लष्करात झालेल्या समझोत्याचा युद्धबंदी हा परिपाक होता', असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. इराण-इस्रायल, हमास-इस्रायल, रशिया-युक्रेन, भारत-पाकिस्तान अशा संघर्षात सध्या झडणाऱ्या शाब्दिक चकमकी पाहता, हा विषय किती गंभीर आहे, हेच दिसते. जगाला मान्य होतील, असे मध्यस्थच आता राहिलेले नाहीत. यातून मुत्सद्देगिरीने मार्ग काढण्याचे प्रयत्न खुंटतात आणि हिंसाचाराला मोकळे रान मिळते. डावपेचात्मक मध्यस्थीऐवजी सध्या स्वतःला पुढे करणाऱ्या सौदेबाजांचे पीक आल्यामुळे जागतिक घडी विस्कटल्यासारखी झाली आहे. विश्वासार्ह मध्यस्थ नसलेल्या जगात आपण राहतो आहोत. २०२५ साली जगभर संघर्षाचा वणवा पेटलेला असताना विश्वास टाकता येईल असे शांतिदूत नसल्याने कुणीच कुणाला जुमानत नाही, असे चित्र आहे. फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी शांतता घडवून आणली. जिमी कार्टर यांनी १९७८ मध्ये कॅम्प डेव्हिड करार केला. त्यांच्यासारखे महान मुत्सद्दी आता केवळ इतिहासात उरले आहेत. सध्याचे तथाकथित शांततादूत प्रत्यक्षात सौदेबाज आहेत. ट्रम्प यांनी केलेल्या मध्यस्थी बरेच काही सांगतात. सर्बिया कोसोवो यांच्यातील मध्यस्थीचे फोटो झळकले; पण आठवड्याच्या आतच ती संपली. उत्तर कोरियाच्या शिखर बैठकीतूनही काही निष्पन्न झाले नाही आणि दक्षिण आशियात त्यांनी केलेला दावा भारताने सपशेल फेटाळला. रशियाच्या व्लादिमीर पुतीन यांनीही २०२५ मध्ये मॉस्को-तेहरान यांच्यात करार घडवून आणला. पश्चिम आशियातील शांतीदूत म्हणून स्वतःला प्रस्थापित करण्याचा पुतीन यांचा प्रयत्न होता. सध्या ते इराणला ड्रोन पुरवणे, सल्ले देणे यात मश्गुल आहेत. चीनची स्वयंघोषित मध्यस्थीही 'स्वार्थी'च असते. जागतिक संघर्ष रोखण्यासाठी जन्माला आलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाला नकाराधिकारांच्या राजकारणाने पांगळे केले आहे. २०२३ साली संयुक्त राष्ट्रांनी गाझा ठराव केला परंतु अमेरिका आणि रशियाच्या अडथळ्यामुळे तो गारद झाला. तुर्की आणि कतार यांनीही मुत्सद्देगिरी करून पाहिली.

---

## कोपरखैरणे ब्लॉक काँग्रेस कमिटीचे साखळी उपोषण!

**नवी मुंबई: (समर्थ गांवकरी)**

कोपरखैरणे सेक्टर ३ मधील चिकणेश्वर उद्यानाच्या प्रलंबित कामांबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाने अद्याप ठोस निर्णय न घेतल्याने नागरिकांत संतापाची भावना आहे. स्थानिक नागरिकांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, या प्रमुख मागणीसाठी कोपरखैरणे ब्लॉक काँग्रेस कमिटीने साखळी उपोषणाचा निर्णय घेतला आहे. गुरुवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजल्या पासून नवी मुंबई महानगरपालिका ई- विभाग कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर हे साखळी उपोषण सुरु करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, उपोषण कायदा सुव्यवस्था राखत, कुठलीही घोषणाबाजी न करता, फक्त शांततेच्या मार्गाने करण्यात येणार आहे. यावेळी स्थानिक नागरिक व काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, प्रलंबित विकासकामांवर निर्णय होईपर्यंत हे साखळी उपोषण सुरू राहणार आहे, असा इशारा देण्यात आला आहे. ब्लॉक काँग्रेस कमिटीने स्पष्ट केले की, "शासनाच्या कामात अडथळा न आणता, शांततापूर्ण मार्गाने आम्ही आमचा हक्क मागणार आहोत." नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा आणि विकासकामांबाबत पालिकेच्या अनास्थेमुळे हा टोकाचा निर्णय घ्यावा लागल्याचेही त्यांनी नमूद केले.

---

## कर्मयोगी आबासाहेब काकडे हेच खरे दिनदलितांचे कैवारी : जगन्नाथ गुळवे

### भालेश्वर विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांची १०६ वी जयंती साजरी

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

दिन, दलित, गोर, गरीब, शेतकरी, ऊस तोडणी कामगारांची मुले, वंचित घटकांची मुलांसाठी शिक्षणाची गंगा या ग्रामीण भागामध्ये सुरू करून या पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, यासाठी भालगाव सारख्या दुर्गम व डोंगराळ भागात विद्यालय उभारून व वस्तीगृहाची निर्मिती करून विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करून दिली आणि या विद्यालयातून हजारो विद्यार्थी घडून ते आज मोठ्या पदावर कार्यरत आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव काकडे आणि जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे यांनी हा वारसा पुढे चालवलेला आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे



प्रमुख अतिथी जगन्नाथ गुळवे यांनी केले.ते भालेश्वर विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त बोलत होते. यावेळी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या प्रतिमेची गावातून लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली.यावेळी हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. प्रथमतः विद्येची देवता सरस्वती, कर्मयोगी आबासाहेब काकडे,स्व. निर्मलाताई काकडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे अतिथींच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमान गोर्डे हे होते. यावेळी माणिकराव खेडकर, विठ्ठल आण्णा खेडकर, पांडूमामा खेडकर,ग्रा. पं. सदस्य बाळासाहेब खेडकर, माजी सरपंच सर्जेराव सुपेकर, संजय बेंद्रे, सुरेश गायके, रावसाहेब गायके, अरुण बैरागी, प्रवीण पाचंग, बाबासाहेब बर्डे, सुनिता भालेराव, रेखा आढाव तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक श्रीकांत सोनवणे यांनी केले तर सूत्रसंचालन भाऊसाहेब शिंदे यांनी केले व आभार विद्यालयाचे समन्वयक दिगंबर नजन यांनी मानले.

---

## श्रीगोंदा तालुक्यात सर्वत्र आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

### श्री व्यंकनाथ विद्यालयात विद्यार्थ्यांना योग दिनाचे प्रात्यक्षिके

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यात सर्वत्र आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्वच शैक्षणिक संस्थांच्या विद्यालयांमध्ये मोठ्या उत्साही वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला. प्रामुख्याने शनिवारी 21 जून रोजी सकाळी आठ ते साडेनऊ वाजेपर्यंत या योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्यनिअर कॉलेजमध्ये ज्येष्ठ योगाचार्य शिवाजीराव पांडव; दत्तात्रेय सस्ते; अर्जुनराव कुलांगे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना योग दिनाचे भरीव असे मार्गदर्शन करत योग



दिनाचे प्रात्यक्षिके केली. या योग दिनाची प्राचार्य मुख्याध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. प्रामुख्याने प्रारंभी राष्ट्रगीता नंतर सूक्ष्म व्यायाम यामध्ये मानेचे व्यायाम; हाताचा व्यायाम इत्यादी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसमवेत आयोजित करण्यात आली. तर योगासनामध्ये ताडासन; वृक्षासन; पादाहस्त; अर्ध चक्रासन; त्रिकोणअसन; वर्जासन शशांकआसन; वक्रासन; इत्यादी योगातील प्रकार विद्यार्थ्यांसमवेत साजरे केले.

विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी मनसोक्तपणे या योग दिनात सहभाग नोंदवला.

विशेष म्हणजे योगासनातील दुसरा प्रकार पोटावरीलअसन यामध्ये सायकलिंग; उताणपादाअसन; अर्धहलासन; पवनमुक्तआसन; श्वासन तर प्राणायामामधील कपाल भारती; भसरीकाअनुलोम मिलन; ब्रह्मश्री इत्यादी योगासनातील महत्त्वाचे प्रकार करण्यात आले. तर ज्येष्ठ योगाचार्य अर्जुनराव कुलांगे यांनी मयूर आसन; शिरशासन इत्यादी प्रकार साजरे केले. याप्रसंगी आस्थाअसनाने ज्येष्ठ योगाचार्य दत्तात्रय सस्ते व शिवाजीराव पांडव यांनी योग दिनाची सांगता केली.

याप्रसंगी योगाचार्य दत्तात्रय सस्ते यांनी या योग दिनाचे महत्त्व सांगताना विद्यार्थ्यांनी सतत व्यायाम करावा; सकस आहार करावा; त्यामुळे शरीर तंदुरुस्त राहून बौद्धिक क्षमता वाढली जाते. त्यामुळे दररोज विद्यार्थ्यांनी नियमितपणे योगासने करावीत असे सांगितले. स्वागत विद्यालयाचे प्राचार्य ए. एल. पुराणे यांनी केले. सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव इथापे यांनी केले.

---



## ठाणे जिल्हा परिषदेत राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

समाजसुधारक, सामाजिक न्यायाचा मूलभूत पाया रचणारे आणि बहुजन समाजाला शिक्षण, आरोग्य व हक्काचा वाटा मिळवून देणारे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने आज, दि. २६ जून, २०२५ रोजी जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत समाज कल्याण विभाग व आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमास समाज कल्याण विभाग व आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. शाहू महाराजांनी दिलेल्या शिक्षण, समानता, आरोग्यसेवा व सामाजिक समतेच्या विचारांचा पुरस्कार करत उपस्थितांनी त्यांचे विचार कृतीत उतरवण्याचा संकल्प घेतला. राजश्री शाहू महाराजांचा आदर्श आजही प्रत्येक प्रशासन व सेवकासाठी प्रेरणादायी आहे, असा सूर सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात आला.

---



## सर्वत्र आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यात सर्वत्र आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्वच शैक्षणिक संस्थांच्या विद्यालयांमध्ये मोठ्या उत्साही वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला. प्रामुख्याने शनिवारी 21 जून रोजी सकाळी आठ ते साडेनऊ वाजेपर्यंत या योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्यनिअर कॉलेजमध्ये ज्येष्ठ योगाचार्य शिवाजीराव पांडव; दत्तात्रेय सस्ते; अर्जुनराव कुलांगे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना योग दिनाचे भरीव असे मार्गदर्शन करत योग दिनाचे प्रात्यक्षिके केली. या योग दिनाची प्राचार्य मुख्याध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. प्रामुख्याने प्रारंभी राष्ट्रगीता नंतर सूक्ष्म व्यायाम यामध्ये मानेचे व्यायाम; हाताचा व्यायाम इत्यादी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसमवेत आयोजित करण्यात आली. तर योगासनामध्ये ताडासन; वृक्षासन; पादाहस्त; अर्ध चक्रासन; त्रिकोणअसन; वर्जासन शशांकआसन; वक्रासन; इत्यादी योगातील प्रकार विद्यार्थ्यांसमवेत साजरे केले. विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी मनसोक्तपणे या योग दिनात सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे योगासनातील दुसरा प्रकार मराठा सेवा संघाच्या तालुकाध्यक्षपदी सुनील गायकवाड सर यांची निवड श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी- तालुक्यात सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असणारे सुनील आबासाहेब गायकवाड यांची नुकतीच मराठा सेवा संघाच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजिनीयर सुरेश इथापे, जिल्हा कार्याध्यक्ष इंजि. बी. के. महाडिक, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत सुनील गायकवाड यांची नियुक्ती करत त्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

---



## अंगणवाडी सेविकेपदी अमृता डोके यांचे स्वागत

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

एकात्मिक बालविकास अंगणवाडी कुमशेत येथे अमृता अक्षय डोके यांनी अंगणवाडी सेविका म्हणून रुजू होत सेवाकार्यात प्रारंभ केला . दोन वर्षांपासून रिक्त असलेल्या या पदावर त्यांची नियुक्ती झाल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले . या कार्यक्रमा प्रसंगी प्रथम ग्रामस्थ , पालक , ग्रामपंचायत सर्व सदस्य , मान्यवर यांच्या हस्ते अंगणवाडी सेविका अमृता डोके यांना शाल व पुष्पगुच्छ पेढे वाटून स्वागत करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या संध्या भगत, सरपंच रवींद्र डोके, पत्रकार , ग्रामपंचायत सदस्य राजेश डोके, बँकेचे माजी अधिकारी सुभाष डोके , माजी संचालक शिवाजी डोके यांनी कार्यक्षम, समर्पित सेवा अपेक्षित असल्याचे मनोगत व्यक्त केले.शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष चेतन भगत, माजी सरपंच विना डोके, माजी ग्रा.पं. सदस्या आशा डोके ,भारतीय सैनिक अक्षय डोके , ह भ प नवनाथ डोके , पांडुरंग डोके, स्वप्निल डोके, कृष्णा डोके , लक्ष्मण डोके , अंगणवाडी माजी सेविका सुलोचना डोके, अंगणवाडी मदतनीस हर्षदा डोके, श्याम सर, घोडे सर, तसेच पालक, माता-भगिनी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## श्री ज्ञानेश्वर माऊली देवस्थान ट्रस्ट, कोळगाव दिंडीचे २५ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान

- **दिंडीमधील वारकऱ्यांना चहापाणी, नाश्ता ,विश्रांती, दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण देण्यासाठी विविध अन्नदाते नियमित उत्सुक असतात. त्यामुळे पायी दिंडी वारी सोहळा सुकर होऊन पंढरपूर येथे अत्यंत आनंदाने वारकरी पांडुरंग व रुक्मिणी यांचे दर्शन घेऊन माघारी परततात.**

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्री संत माऊली ज्ञानेश्वर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कोळगाव येथील माऊली मंदिरचा श्री ज्ञानेश्वर माऊली देवस्थान ट्रस्ट कोळगाव आयोजित आषाढी वारी पायी दिंडी सोहळा 25 जून रोजी मार्गस्थ होत असून यंदाचे हे 24 वे वर्ष असल्याचे या देवस्थानचे अध्यक्ष ह भ प मधुकर काका लगड यांनी माहिती दिली.

ह भ प मधुकर काका लगड



यांनी पुढे सांगितले की, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींनी प्रत्यक्ष कोळगाव येथील माऊली मंदिराच्या ठिकाणी भेट दिली होती. त्यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या परिसरात माऊलींचे भव्य असे मंदिर उभारले असून परिसरात स्वच्छता, वृक्षारोपण व लाईटची व्यवस्था केल्याने हे ठिकाण भाविकांचे आदरस्थान झाले असून विविध कार्यक्रमांचे मुख्य केंद्र बनले आहे. यंदाचे हे 24 वे वर्ष असून दरवर्षी परमपूज्य गुरु स्वामी परमहंस आनंदाश्रम स्वामी (दंडी) यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प पांडुरंग महाराज क्षीरसागर यांच्या प्रेरणेने (कन्हेरमळा) कोळगाव ठिकाणावरून आषाढी वारी पायी दिंडी मार्गस्थ होत असते. भाविकांच्या सहकार्याने पंढरपूर येथे माऊली देवस्थाने 11 गुंठे जागा घेतली असून तेथे भाविकांसाठी स्वच्छतागृहासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

परिसरातील शेकडो भाविक मोठ्या संख्येने या दिंडीत सहभागी होत असतात त्यामध्ये आबाल वृद्धांपासून महिला व तरुणांचा ही सहभाग उल्लेखनीय असतो. यावर्षी आषाढी वारी पालखी श्री,क्षेत्र माऊली देवस्थान कोळगाव येथून माऊलींची आरती अभिषेक पादुका पूजन झाल्यानंतर 25 जून रोजी सकाळी 11 वाजता मार्गस्थ होत असून ही वारी पारगाव, पेडगाव, बारडगाव ,कोर्टी, कुंभेज फाटा, कंधर ,भुईंजे, मोडनिंब, रोपळे या मार्गाने चार जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होत आहे. त्यानंतर तीन दिवस तेथेच मुक्काम करून सात जुलै रोजी सांगता होऊन पुन्हा कोळगाव येथे माघारी असा प्रवास होणार आहे. सुनियोजित व योजनाबद्ध रीतीने दहा दिवसांचा हा सोहळा पंढरपूर येथे माऊली चरणी दाखल होत आहे अशी माहिती श्री लगड यांनी दिली.

या दिंडीची व्यवस्था प्रमुख विश्वस्त व दिंडी चालक मधुकर काका लगड ,नितीन लगड, शरद लगड, प्रशांत लगड, प्रवीण लगड, राजेंद्र दळवी व अक्षय लगड, विलास डूबल, सागर नलगे, संतोष नलगे , धनंजय लगड, सतीश लगड, चंद्रकांत काटे हे पाहतात.



## कलाशिक्षक जगताप यांनी रेखाटलेल्या छायाचित्राने भक्तांचे लक्ष वेधले

पाथर्डी (स. गांवकरी) : तालुक्यातील मुंगूसवाडे येथील श्रावण भारती बाबा प्रशाला या विद्यालयातील कलाशिक्षक किशोर जगताप यांनी रेखाटलेले राष्ट्रसंत भगवान बाबा व वारकऱ्यांच्या दिंडीचे छायाचित्र भगवान बाबाच्या दिंडीत लीन झालेल्या वारकऱ्यांचे व भगवान परमात्मा रुक्मिणी पांडुरंगाच्या भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे. महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र भगवानगड येथील संस्थापक/ अध्यक्ष राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पालखी दिंडी नुकतीच भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री व भगवान गडाचे उत्तराधिकारी ह. भ. प. कृष्णा महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गस्थ होत आहे. या पार्श्वभूमीवर कलाशिक्षक जगताप यांनी अविष्कार कलाकृतीने रेखाटलेले भगवान बाबा व वारकऱ्यांच्या दिंडीचे छायाचित्र दिंडीतील व पंढरपूरच्या वाटेने पायी चाललेल्या भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.

## धर्मराजा ग्रुप तर्फे धुमाळ परिवाराला एक लाखाची मदत

भिवंडी (स. गांवकरी) : कामवारी नदीत बुडून गोरसई गावातील सागर परशुराम धुमाळ वय वर्षे ३३ आणि अक्षय परशुराम धुमाळ वय वर्षे २७ या दोन भावांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना २० जून रोजी घडली आहे. या धुमाळ परिवाराला भिवंडीत सामाजिक कार्य करणाऱ्या धर्मराजा गृपचे अध्यक्ष निलेश चौधरी यांच्या वतीने एक लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. दिड वर्षापुर्वीच त्यांचे वडील परशुराम गणू धुमाळ यांचे देखील निधन झाले असून आता हे दोन सख्खे भाऊ ही मयत झाल्याने या धुमाळ कुटूंबावर खुप मोठा दु:खाचा डोंगर कोसळला असून या कुटूंबातील ९ लोकांची मोठी जबाबदारी त्यांच्या घरातील एकाच माणसावर आल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व्हावी म्हणून ही मदत केली असल्याची माहिती धर्मराजा गृपचे अध्यक्ष निलेश चौधरी यांनी दिली आहे.



## पोलीस उपनिरीक्षक शुभांगी मोरे यांचा डॉ. सारिकाताई नागरे यांच्या हस्ते सत्कार

लोणी (स. गांवकरी) : सुवर्ण भरारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. सारिकाताई नागरे यांनी लोणी प्रवरा पोलीस स्टेशनला डॉ. सारिकाताई नागरे यांनी सदिच्छा भेट दिली . यावेळी कर्तव्यदक्ष उपनिरीक्षक शुभांगी मोरे मॅडम यांच्या धाडसी कार्याची प्रशंसा करत त्यांचा विशेष सत्कार केला. मोरे मॅडम यांच्या कार्याला मिळालेल्या या सन्मानामुळे पोलीस दलाचे मनोधैर्य वाढण्यास निश्चितच मदत होईल, असे मत यावेळी डॉ. सारिकाताई नागरे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी राष्ट्रीय प्रसिद्धीप्रमुख रवी भाऊ माळवे, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र कुलथे, प्रदेश उपाध्यक्ष मुक्ताताई डहाळे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष , स्वातीताई मुंडलीक तसेच रामभाऊ नेहे काका हे उपस्थित होते. डॉ. सारिकाताई नागरे यांनी मोरे मॅडम यांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि धैर्याचे विशेष कौतुक केले. लोणी प्रवरा परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोरे मॅडम यांनी केलेल्या अथक प्रयत्नांची आणि त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांची त्यांनी प्रशंसा केली. पोलीस दलातील अशा अधिकाऱ्यांमुळे समाजाला सुरक्षिततेची भावना मिळते आणि गुन्हेगारीला आळा बसतो असेही त्या म्हणाल्या. या सत्कार समारंभामुळे पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आणि त्यांना आणखी चांगल्या प्रकारे आपले कर्तव्य बजावण्यासाठी प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# बिनबुडाचे भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करा

### पराभवाची धडकी भरलेल्या थोरात गटाचा बंदोबस्त करा : जोर्वे ग्रामस्थ आक्रमक

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

40 वर्षे सत्ता असूनही ज्यांना 40 कामे जमली नाही आणि आता गावातील विकासकामे राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सुरू आहेत. हा चालू असलेला विकास कामांचा वाढता आलेख झेपत नसल्याने विरोधक नाहक भ्रष्टाचाराचे आरोप करत आहे. या सर्व आरोपांची लवकरात लवकर चौकशी करावी. जर आरोप सिद्ध झाले नाही तर आरोप करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून जोर्वे ग्रामपंचायतवरील सत्ताधारी विखे गटाने केली आहे. दरम्यान, संगमनेर पंचायत समिती प्रशासनाला सत्ताधारी विखे गटाने गुरुवारी (दि.26) निवेदन



दिले. यावेळी सरपंच प्रिती दिघे, शिवाजीराव कोल्हे, बाबासाहेब काकड,सचिन दिघे,संपतराव राक्षे,हरीष जोर्वेकर, प्रकाश काकड,विशाल थोरात, नंदू थोरात, शिवाजी काकड, रमेश इंगळे, प्रशांत इंगळे,सचिन मोकळ,अभिषेक चव्हाण, बाबासाहेब थोरात, जगदीश इंगळे,भाऊसाहेब वाकचौरे, रविंद्र गाडेकर, बंडू इंगळे,मिराबाई थोरात, लताताई काकड, मिना इंगळे,वनिता चव्हाण, अलका चव्हाण, अनिता लोणारी, दुर्गा लोणारी, निशिगंधा इंगळे, सुनीता बर्डे, अनिता मोरे,रंजना जाधव, सरला जोर्वेकर आदी उपस्थित होते.

या निवेदनात सत्ताधारी गटाने म्हटले की, गावात सुसज्ज असे ग्रामपंचायत कार्यालय, ट्रॅक्टर, ट्रॉली, टँकर, ब्लोअर, रुग्णवाहिका, दवाखाना, अमररथ, पथदिवे, सौरदिवे, गटारी, रोहित्र, पाणीपुरवठा,सभामंडप, रस्ते,वैयक्तिक लाभाच्या योजना अशी विविध प्रकारची विकासकामे झाली आहे तर काही चालू आहे.

गावातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे काम सुरू होणार आहे.

परंतु, हे विरोधकांना पाहवत नसल्याने भ्रष्टाचाराचा आरोप करुन समाज माध्यमांवर आम्हांला बदनाम करण्याचे काम करत आहे.

मात्र, महिला सरपंच आहे म्हणून काहीही आरोप तुम्ही करत असाल तर आम्ही कदापिही सहन करणार नाही. इतकी वर्षे जनतेला कायम वेठीस ठेवलं आता हे बंद करा. महिलांना मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण देऊन मशिन वाटल्या, मोफत बेकरी प्रशिक्षण दिलं. प्रत्येक कामात अडथळा आणणे, ग्रामसेवकांना अरेरावीची भाषा वापरणे आणि एका थोरात सदस्याने तर राजकीय वरदहस्ताने व दादागिरीच्या बळावर ग्रामपंचायतची जागा व विहीर बळकावण्याचा प्रयत्न केला हे मुद्दे आम्ही बोललो म्हणून आम्ही भ्रष्टाचार केला.

त्यामुळे विरोधकांनी जे बिनबुडाचे भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहे त्याची लवकरात लवकर चौकशी करावी.

जर हे आरोप सिद्ध झाले नाही तर ज्यांनी आरोप केले त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी सत्ताधारी गटाने पंचायत समिती प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून केली आहे.

> इतिहासात कधी झाली नाही एवढी विकासकामे व योजना गरिबांपर्यंत ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटिल यांच्या माध्यमातून पोहोचविल्यामुळे आमची वाढलेली लोकप्रियता बघून आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत जोर्वे गटात उभे राहण्यासाठी धडकी भरलेल्या कोणतेही विकास कामे न करता फक्त सामान्य जनतेला वेठीस धरून राजकारण करणाऱ्या इंद्रजीत थोरात यांनी वातावरण निर्मिती करण्यासाठी हे उद्योग सुरु केले आहे. मागच्या 40 वर्षांत काहीच न केल्यामुळे जनतेने यांना विधानसभा निवडणुकीत धडा शिकवला आहे. आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत कमीत कमी स्वगृही तरी इज्जत राहावी म्हणून त्यांचा चाललेला हा शेवटचा केविलवाणा प्रयत्न आहे. परंतु "यह पब्लिक है, सब जाणती है" - **गोकुळ दिघे (जोर्वे)**

# तुमची पाटीलकी आडवी येते त्याला आम्ही काय करणार ?

■ सचिन पठारे यांचा राहुल पाटील शिंदे यांना टोला

सुपा: (समर्थ गांवकरी)

नगर तालुक्यातील गावांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे खा. नीलेश लंके यांनी राबविलेली स्वच्छता मोहिम व गड किल्ले संवर्धन उपक्रमांतर्गत करण्यात येत असलेल्या गडांच्या स्वच्छतेवर टिका करणाऱ्या भाजपाचे मंडलाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांना वाळवणेचे माजी सरपंच सचिन पठारे यांनी चांगलेच खडे बोल सुनावत झाडू हाती



घ्यायला तुमची पाटीलकी आडवी येते त्याला आम्ही काय करणार असा टोला लगावला आहे. पठारे यांनी सांगितले की, अतिवृष्टीमुळे ज्यावेळी गोरगरीबांच्या घरात पावसाचे पाणी शिरते, जनावरे वाहून जातात त्याचा कळवळा नीलेश लंके यांच्यासारख्या लोकनेत्यालाच येऊ शकतो. तुमच्या सारख्या कडक ड्रायक्लिनचे कपडे घालून केवळ पाहणी दौरा करणारांना, तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या तसेच प्री वेडिंग व पोस्ट वेडिंग पुढाऱ्यांना काय येणार ? झाडू हाती घ्यायला तुमची पाटीलकी आडवी येते त्याच द्वेशातून तुम्ही टीका करत आहात. कोणाची तरी खुशमस्करी करून राजकारण करण्याचे दिवस आला संपले आहेत.व्यासपीठावरून भाषणे ठोकून कोणी पुढारी होत नाही हे देखील लक्षात ठेवा असेही पठारे यांनी शिंदे यांना सुनावले. झाड लोट केली म्हणून तुम्ही टीका करता. झाड लोट करणारांना कमी समजू नका. ते साफ-सफाईचेच काम करतात. म्हणून तुमची गावं, शहरं स्वच्छ राहतात. बाकी तुम्ही कचरा करणारच आहात आणि तुमच्यासह तुम्ही केलेला कचरा एक दिवस हाच कचरा साफ करणारा कायमचा साफ करणार आहे. तुम्हाला त्याचा यापूर्वीच अनुभव आलेला असल्याचेही पठारे म्हणाले. हप्तेखोरीचे बिनबुडाचे आरोप करताना आपण टीका करतो त्यावेळी आपले योगदान काय हे पाहिजे पाहिजे. तुम्ही किती स्थानिक भुमिपूत्रांना रोजगार उपलब्ध करून दिला ? एमआयडीसीमध्ये आपली किती जमीन गेली ? त्याचा परतावा किती मिळाला ? याची उत्तरे तुम्ही जनतेला द्यावीत असे आव्हान पठारे यांनी शिंदे यांना दिले. सुप्यात विविध ठिकाणी तुम्ही बांधकामापूर्वी लोकांकडून आगाऊ पैसे घेउन दहा बारा वर्षे झालीत तरीही एकाही व्यक्तीला गाळयाचा ताबा का दिला नाही ?

## संजय महाडिक पुणेकर लोककला गौरव पुरस्काराने सन्मानित



खोडद : (समर्थ गांवकरी)

बालगंधर्व परिवार ट्रस्ट व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व यांचा बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे 57 वर्धापन दिनांक 24,25 ,26 जून रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांना त्यांच्या कलेचे योगदान लोककलेच्या लोककलेचा गौरव म्हणून लोककला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावर्षीचा 2025 चा लोककला गौरव पुरस्कार संगीतरत्न दत्ता महाडिक पुणेकर यांचे चिरंजीव संजय महाडिक यांना हा पुरस्कार बालगंधर्व परिवार ट्रस्टचे अध्यक्ष मेघराज भोसले, सचिव अनिल गुंजाळ, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्या उपस्थितीत हा सन्मान देण्यात आला.

## शालेय मुलींना स्वतंत्र बस सुविधा उपलब्ध करुन देणार

गोपाल पगारे

वैजापुर : (समर्थ गांवकरी)

मुलींची गैरसोय टाळण्यासाठी आणि शैक्षणिक हित लक्षात घेऊन शाळेसाठी मुलींना स्वतंत्र बस सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन वैजापुर आगाराचे सहायक वाहतुक अधिक्षक गोपाल पगारे यांनी दिले.



महालगाव (ता. वैजापुर) येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूलमध्ये "एसटी पास थेट तुमच्या शाळेत " या योजने अंतर्गत प्रशालेतील मुलींना अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेचे पास वाटप करण्यात आले या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक जे. बी. नारळे हे होते तर वैजापुर आगाराचे वरिष्ठ लिपीक आजिनाथ मुळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रशालेत बाहेरगावाहून येणाऱ्या वाघलगाव, सिरसगाव, चिंचडगाव, भगूर फाटा येथील ५५ मुलींना पासचे वितरण यावेळी करण्यात आले .तर प्रवासादरम्यानच्या अनेक समस्या यावेळी सहायक वाहतुक अधिक्षक गोपाल पगारे यांच्या समोर विद्यार्थीनींनी मांडल्यानंतर मुलींची गैरसोय होऊ नये म्हणून आणि त्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता शालेय वेळे अगोदर आणि शाळा सुटल्यानंतर स्वतंत्र बस सुरु करण्यात येईल तसेच अकोली वाडगाव, चौदा मैल येथील विद्यार्थ्यांसाठीही नविन बस सुरु करण्या संदर्भात विचार करून लवकरच अकोली वाडगाव या मार्गाची पाहणी केली जाईल.

तसेच त्यांना पास उपलब्ध करुन देण्यात येतील आणि अकोलीवाडगाव येथील मुलांची होणारी गैरसोय टाळण्यात येईल असे आश्वासन यावेळी स. वा. अ. पगारे यांनी दिले तसेच जास्तीत जास्त मुलीनी मोफत पास योजनेचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक जे. बी. नारळे यांनी प्रशालेच्यावतीने स्वतंत्र बसची मागणी करणारे निवेदनही मान्यवरांना दिले. याप्रसंगी प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# ऐतिहासिक महाराष्ट्र उद्योजक मेळाव संपन्न

■ छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार डॉक्टर विलास पांगारकर यांचा गौरव

छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)





फोस्टर कॉलेज येथे डब्ल्यूएमबीएन फाउंडेशन आणि भारत क्रांती मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र उद्योजक मेळावा आणि छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला . महाराष्ट्रात उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या समाजसेवकांना सन्मानित करणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता. हा सोहळा महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक पाऊल ठरला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्काराचे वितरण छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विलासभाऊ पांगारकर यांनी आजवर केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला. संभाजीनगरचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष द्वारकानाथ पाथ्रीकर, पृथ्वीराज पवार यांना ही छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख उद्देश आणि महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प

* उद्योजक निर्मिती: महाराष्ट्रात मोठ्या संख्येने नवीन उद्योजक तयार करणे, ज्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल.
* कृषी ड्रोन उद्योगाला प्रोत्साहन: शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम असलेल्या कृषी ड्रोन उद्योगात नवोदित उद्योजकांना येण्यासाठी प्रेरित करणे. हा उद्योग कृषी क्षेत्रात क्रांती घडवण्याची क्षमता ठेवतो.
* उद्योजकांसाठी व्यासपीठ: राज्यातील सर्व समाजातील उद्योजकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणून, त्यांना व्यवसायासाठी नवी दिशा, गती आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, तसेच समाजात आर्थिक साक्षरता व उद्योजकतेची भावना अधिक दृढ करणे.
* उत्कृष्ट समाजसेवकांचा सन्मान: समाजाच्या उन्नतीसाठी निस्वार्थपणे आणि प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या उत्कृष्ट समाजसेवकांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करणे, जेणेकरून त्यांचे कार्य इतरांना प्रेरणा देईल.

या सोहळ्यात महाराष्ट्रात लाखों उद्योजक घडवण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प करण्यात आला. या संकल्पाच्या पूर्ततेसाठी भारत क्रांती मिशनतर्फे महाराष्ट्रभर उद्योजक मेळावे घेण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही करण्यात आली, जी राज्याच्या उद्योजकता वाढीसाठी एक मैलाचा दगड ठरेल. कार्यशाळेतील माहिती आणि उपस्थित मान्यवर

भारत क्रांती मिशनच्या महाराष्ट्र उद्योजकता विकास कार्यशाळेत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कृषी ड्रोनचा वापर आणि बँकांच्या कृषी कर्ज योजनांविषयीची सखोल माहिती श्री. मुंढे आणि धांडे यांनी दिली.

या कार्यक्रमाला अनेक नामवंत व्यक्तींची उपस्थिती लाभली. ज्येष्ठ समाजसेवक द्वारका भाऊ पाथ्रीकर, पृथ्वीराज पवार, छावाचे डॉ. विलास पांगारकर, हरिश्चंद लघाने पाटील, माजी आमदार किशोर पाटील, सभापती राधाकिसन पठाडे, आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ नाना काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक विजय काकडे पाटील यांनी प्रास्ताविक करून सोहळ्याची भूमिका स्पष्ट केली, तर शिंदखेड राजा येथील लखुजीराव जाधवांचे वंशज राजे शिवाजीराव जाधव यांनी अध्यक्षस्थान भूषवले.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि शिवराय प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. बालवक्ती कु. अक्षरा काकडे हिने आपल्या स्फूर्तिदायक भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. देवगिरी बँकेचे अध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष भाजपा किशोर शितोळे यांच्यासह कृषी अधीक्षक, प्रसिद्ध उद्योजक, राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी गौरव पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्तींना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे अभिनंदन केले.

या ऐतिहासिक सोहळ्याला मोहन हिंदोळे, परमेश्वर नलावडे, सतीश जगताप, विलास नलावडे, पंढरीनाथ काकडे, जीवन दादा देशमुख, आनंदी काकडे, प्रदीप बिल्लोरे, अरुण कदम, अवधूत शिंदे, वरुण पाथ्रीकर, अनुपमा पाथ्रीकर, सविता कदम, पूजा काकडे, मच्छिंद्र घरपडे, पत्रकार अमोल सोनवणे, विजय नन्नवरे, अतुल पांगारकर, मिलिंद गायकवाड, विष्णू पांगारकर, संपत जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

> हा मेळावा महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि सेवाभावी प्रगतीसाठी एक अत्यंत महत्त्वाचे आणि ऐतिहासिक पाऊल ठरला, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. समर्थ गावकरी जिल्हा प्रतिनिधी व साप्ताहिक आपला आवाज संपादक अमोल सोनवणे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला

## २७ जून रोजी हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन!

■ एस.एम.बी.टी. व हरिश्चंद्र मेडीकल फाउंडेशन च्या माध्यमातून २७ जुन २०२५ रोजी शिबिर आयोजित!

अकोले : (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील नागरिकांच्या हृदयविकारासंबंधित तपासण्या व आरोग्याची काळजी घेण्यासाठी हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, अकोले तसेच एस.एम.बी.टी. व हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जून २०२५ रोजी अकोले येथे मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात ज्येष्ठ हृदयरोग तज्ञ डॉ. गौरव वर्मा सर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांची वैद्यकीय तपासणी होणार आहे. आधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साहाय्याने हृदयविकाराशी संबंधित महत्वाच्या चाचण्या व वैद्यकीय मार्गदर्शन या शिबिरात मोफत दिले जाणार आहे.

शिबिरात उपलब्ध असणाऱ्या प्रमुख तपासण्या:
हृदयाचे ठोके (Pulse Checkup)
ईसीजी (Electrocardiogram)
रक्तदाब (:lood Pressure)
कोलेस्टेरॉल तपासणी
वजन आणि बीएमआय मोजणी
प्राथमिक वैद्यकीय सल्ला




या शिबिराचे आयोजन डॉ. श्री. भांडकोळी सर व डॉ. सौ. भांडकोळी मॅडम यांच्या संकल्पनेतून करण्यात आले असून, अकोली परिसरातील नागरिकांना दर्जेदार व मोफत वैद्यकीय सेवा मिळावी हा यामागचा मुख्य हेतू आहे. शिबिराच्या आयोजनाची सर्व तयारी पूर्णत्वास नेली जात असून, तपासणीसाठी कुशल वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ आणि तज्ञ डॉक्टरांची टीम सज्ज आहे. ग्रामीण भागात वाढत चाललेल्या हृदयविकाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर हे शिबिर काळाची गरज ठरत आहे.



## दिव्यातील ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये अँटी ड्रग जनजागृती कार्यक्रम संपन्न

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिव्यातील ग्लोबल इंग्लिश स्कूल मध्ये अँटी ड्रग जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ग्लोबल इंग्लिश स्कूल, दिवा येथे इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी "अँटी ड्रग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे विशेष मार्गदर्शन मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलिस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर व सहायक पोलीस निरीक्षक वसंत ख़तेले यांनी केले. सदर कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे दुष्परिणाम समजावणे, त्यांच्यापासून दूर राहण्याचे महत्व पटवून देणे आणि समाजात जबाबदार नागरिक घडविणे हा होता. अमोल कोळेकर व ख़तेले सर यांनी विद्यार्थ्यांशी अत्यंत प्रभावी आणि थेट संवाद साधत वास्तव परिस्थिती विषद केली. प्रसंगी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी विविध प्रश्न विचारून आपली शंका दूर केली. सदर कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे संचालक महेंद्र दळवी तसेच शाळेच्या मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, शिस्त आणि उत्तम नागरिक होण्याची जाणीव निर्माण होते.

## सोनिया गांधी श्रीगोंदा पॉलिटेक्निकचे विद्यार्थि महाराष्ट्रात प्रथम





■ कुमारी अनुष्का विलास खळतकर व कुमारी श्रावणी महादेव पडवळ गणित विषयात १०० पैकी १०० गुण

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने एप्रिल मे २०२५ मध्ये घेतलेल्या उन्हाळी परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत यात सोनिया गांधी पॉलिटेक्निकचा सरासरी निकाल ९८ टक्के लागला असून ग्रामीण महारष्ट्रातील विविध पॉलिटेक्निच्या तुलनेत सोनिया गांधी पॉलिटेक्निकने उत्कृष्ट निकालाची परंपरा पुढे चालू ठेवली असल्याची प्रतिक्रिया प्राचार्य अमोल नागवडे यांनी दिली. नागवडे यांनी सांगितले कि प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागामधील कुमारी अनुष्का खळतकर व श्रावणी पडवळ या दोन विद्यार्थिनींनी गणित विषयांमध्ये शंभर पैकी १०० गुण घेऊन व कॉम्पुटर इंजिनिरींगच्या चौथ्या सत्रात श्रेया शिंदे हिने ९६% टक्के गुण मिळवून कॉलेज मध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागामध्ये प्रथम वर्षासाठी खळतकर अनुष्का 90% प्रथम ,खोमणे प्राजक्ता ८७.६५% द्वितीय, पडवळ श्रावणी ८७.२९% तृतीय ,तसेच द्वितीय वर्षांमध्ये भोंडवे प्रियंका ८१.७८% व डोके निकिता ८१.७८% प्रथम, पांढरकर अश्विनी ८०.८९% द्वितीय,घाटे गौरी ७९.५६% तृतीय, तसेच तृतीय वर्षामध्ये जठार वसुधा ९१.४७% प्रथम, लगड सार्थक ९१.२०% द्वितीय,गोरे अथर्व ९०.२७% तृतीय. कॉम्प्युटर विभागामध्ये प्रथम वर्षासाठी सानिका शिंदे ९३.८८ % प्रथम,समीक्षा दरेकर ९३.६५ % द्वितीय, सायली सोनवणे ९२.७१ % तृतीय, तसेच द्वितीय वर्षामध्ये श्रेया शिंदे ९६ % प्रथम, समृद्धी वाबळे ९१.१८ % द्वितीय,अनुष भुजबळ ८९.८८ % तृतीय, तसेच तृतीय वर्षांमध्ये वैष्णवी जाधव ९१.७७ % प्रथम, भक्ती भाकरे ९०.७१ द्वितीय,कोमल देशमुख ८८.४७% तृतीय. तसेच मेकॅनिकल विभागांमध्ये प्रथम वर्षामध्ये शेळके सुरज ७९.६७ % प्रथम, कंगने हर्षद ७८.७८ % द्वितीय, गजर नवनाथ ७७.७८ % तृतीय, तसेच द्वितीय वर्षांमध्ये भांडवलकर भाग्येश ८३.६७ % प्रथम, नलगे अनिकेत ८२.७८ % द्वितीय,बोणगे रोहन व सातव ओम ७९.८९ % तृतीय, तसेच तृतीय वर्षामध्ये जराड अनिकेत ७९.११ % प्रथम गागरे, अनिकेत ७८.७८ % द्वितीय, मडके राहुल ७७.७८ % तृतीय. तसेच इलेक्ट्रिकल विभागामध्ये प्रथम वर्षामध्ये सांगळे विश्वजीत ८३.०६% प्रथम,चव्हाण चैतन्य 81.65% द्वितीय, कंद अंकिता 80. 82% तृतीय, तसेच द्वितीय वर्षांमध्ये ईश्वरी लोखंडे ७५.८० % प्रथम, कोमल लोखंडे ,नवले आदित्य व साक्षी जाधव ७५ % द्वितीय, होले दिग्विजय ७२.४७% तृतीय, तसेच तृतीय वर्षांमध्ये शेख जहीर ८४.२५ % प्रथम,नलगे सार्थक ८४% द्वितीय, खरात प्रतीक ८३.८८ % तृतीय. तसेच सिविल विभागामध्ये प्रथम वर्षामध्ये शेख साजमिन ७७.३३ % प्रथम, भुजबळ अथर्व ७२.३३ % द्वितीय, बावधनकर रोहन ७१.६७% तृतीय.

# संघर्ष जीवनाचा एक वाचनीय कथासंग्रह परिक्षण

### सौ. माया तुषार जगताप रॉयल इंग्लिश स्कूल छत्रपती संभाजीनगर





लेखक परिचय

प्रा. राम शंकर सोनवणे (पत्रकार)

एम.ए.(इतिहास) एम.ए.(राज्यशास्त्र) एम.ए.(समाजशास्त्र) बी.एड.

एन.एस.गुळवे ज्युनिअर कॉलेज, श्रीगोंदा

ई-मेल:-ram.sonawane71@gmail.Com

शैक्षणिक सेवा-

- २२ वर्ष विना पगारी ज्ञानदानाचे कार्य दैनिक लोकमत, दैनिक सार्वमत, दैनिक प्रभात, दैनिक देशदूत, दैनिक लोकबंध, दैनिक श्रीगोंदा सिटीझन, दैनिक राष्ट्र सह्याद्री, साप्ताहिक संघर्षनामा, संघर्षनामा मल्टिमीडिया, दैनिक जलभूमी आदी वृत्तपत्रांचे पत्रकार म्हणून काम केले आहे.
- दैनिक सार्वमत शब्दगंध पुरवणी मधून अनेक कथा प्रसिद्ध, सलग तीन वर्षे राज्यस्तरीय विजेता दिवाळी अंक गावगाथा मधून वाचनिय कथा प्रसिद्ध.
- १९ हुबेहुब पशुपक्ष्यांचे आवाज काढून मिळणाऱ्या मानधनातून थोडे स्वतःसाठी घेऊन उरलेले मानधन आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दिले जाते. दोन विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाले असून ते आज स्वः च्या पायावरती उभे आहेत

राज्यस्तरीय पुरस्कार :-

- राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय पुरस्कार, डॉ. आनंद यादव साहित्य रत्न पुरस्कार, निसर्ग रत्न पुरस्कार.

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

प्रा.राम सोनवणे लिखीत "संघर्ष जीवनाचा" या कथासंग्रहाचे पुस्तक परीक्षण हाती घेताना खूप आनंद झाला.मी एक स्वतः ला नशीबवान म्हणते की ज्या प्रा.राम सोनवणे यांनी अत्यंत खडतर परिस्थितीतून शिक्षण घेवून एका कायम विनाअनुदानित ज्युनिअर कॉलेजवर प्राध्यापक म्हणून ज्ञानदानाचे २२ वर्ष विना पगारी कार्य केले हे कौतुकास्पद बाब आहे.पगार नसल्याने किती समस्यांना तोंड द्यावे लागते हे त्यांनी अगदी ग्रामीण भाषेतून या कथासंग्रहात २१ कथा लिहिल्या आहेत.याच कथासंग्रहातील आधार कथा वाचन केली तर गरीब परिस्थितीमुळे मूळ गाव सोडून पोट भरण्यासाठी दुसऱ्या गावात आल्यावर प्रत्येक दिवशी पोटासाठी किती संघर्ष करावा लागतो हे वाचन करताना अक्षरशः डोळ्यातून न सांगता अश्रूंच्या धारा वाहू लागल्या.गरीबी असते पण एवढी वाईट -! विना पगारी शिक्षक असला की त्यांच्या लग्नाला सुध्दा अनंत अडचणी येतात लेखकाने स्वतः आलेले अनुभव "लग्न" या कथेत सर्वच वर्णन केले असून ते वाचनीय आहे. या कथेचे वाचन करताना खूप आनंद देखील होतो आणि शेवटी वाईट देखील वाटते असे अनेक प्रसंग या कथेत आहेत.शेतकरी आपली स्वप्ने रंगविण्यासाठी रात्रंदिवस शेतात काबाडकष्ट करून सुद्धा त्याच्या इच्छा पूर्ण होत नाहीत अशी अपेक्षाभंग करणारी "कष्ट" नावाची कथा आहे.माझा मुलगा सर झाला आता त्याला मोठा पगार असणार अशा अपेक्षा उराशी बाळगून वयोवृद्ध जीवन जगणारे मायबाप माझ्या पोराला पगार होईल पण जीवंत असे पर्यंत पगार मिळत नाही शेवटी वयाच्या ९२ व्या वर्षी एका महिन्याच्या फरकाने जगाचा कायमचाच निरोप घेतात याच्या वेदना लेखकाला आज ही जाणवतात ही एक फार मोठ दुर्दैव आहे.जीवनाचा संघर्ष ही कथा आर्थिक दृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना प्रेरणादायी कथा असून किती खडतर परिस्थितीतून मार्ग काढत आपले ध्येय साध्य केले.अशी परिस्थिती असताना सुद्धा काही गरीब मुलांना आधार देत त्यांच्या जीवनात प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला ही बाब सुध्दा कौतुकास्पद आहे.दिवसभर स्वप्न रंगवल पण एका रात्रीत ते उध्दवस्त झाले ती मनाला चटका लावणारी 'अपेक्षाभंग "कथा अगदी वाचनीय आहे.शिक्षण क्षेत्रातील देवा सारखी मुलं आपल्याशी केली तर ती सुद्धा आपल्या विषयी किती अफाट प्रेम व्यक्त करतात त्यांच्या मनात शिक्षक विषयी आपुलकी निर्माण होते याचा एक समाजात आदर्श निर्माण करणारी अशी एक प्रेरणादायी कथा आहे. यातूनच शिक्षक -पालक- विद्यार्थी अशा प्रकारेचे सुत्र तयार होते.

हक्काचा पगार सुरू व्हावा यासाठी आंदोलनाला मुंबईला जाण्यासाठी पैसे नसल्याने किती समस्यांना तोंड द्यावे लागते याचा अर्थ असा होतो की पैशासाठी किती संघर्ष करावा लागतो हे या कथेवरून दिसून येते. सख्या रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेली नाती किती श्रेष्ठ आहे हे आपुलकी कथेतून दिसून येते. आपल्याला पगार नसताना आहे त्या परिस्थितीत एका उभय दाम्पत्यास अंतःकरणातून यात्रेला येण्याचा आग्रह केला जातो. रोजचेच जेवन पण त्याच जेवणाला आपुलकीने वेगळं पण देवून एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणारी एक आदर्शवत कथा समाजातील माणसांना प्रेरणादायी कथा आहे. नविनच एका खेडेगावातील वाडी असून तेथे सत्तर ते ऐंशी वर्षांनंतर अखंड हरिनाम सप्ताह सुरू होत असताना लोकांचा संवाद, एकमेकांबद्दल असणारे आदरभाव निर्माण करणारी कथा असून या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आलेले अनुभव लेखकाने सप्ताह कथेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.हा संघर्ष जीवनाचा कथासंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरल्या शिवाय राहणार नाही अशी अपेक्षा व्यक्त करते.

वेदिका प्रकाशन उदगीर
जिल्हा.लातूर
संघर्ष जीवनाचा कथासंग्रह
लेखक -प्रा.राम शंकर सोनवणे
किंमत -२००रुपये
पहिली आवृत्ती - फेब्रुवारी २०२५

## संजय महाडिक पुणेकर लोककला गौरव पुरस्काराने सन्मानित



खोडद : (समर्थ गांवकरी)

बालगंधर्व परिवार ट्रस्ट व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व यांचा बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे 57 वर्धापन दिनांक 24,25 ,26 जून रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांना त्यांच्या कलेचे योगदान लोककलेच्या लोककलेचा गौरव म्हणून लोककला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावर्षीचा 2025 चा लोककला गौरव पुरस्कार संगीतरत्न दत्ता महाडिक पुणेकर यांचे चिरंजीव संजय महाडिक यांना हा पुरस्कार बालगंधर्व परिवार ट्रस्टचे अध्यक्ष मेघराज भोसले, सचिव अनिल गुंजाळ, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्या उपस्थितीत हा सन्मान देण्यात आला .संजय महाडिक हे संगीतरत्न दत्ता महाडिक यांचे चिरंजीव आहेत. ज्यांनी तमाशा कला सातासमुद्र पार केली. असे तमाशा संगीताचे शिरोमणी संगीतरत्न दत्ता महाडिक पुणेकर यांचे निधन झाल्यानंतर आज पर्यत संजय महाडिक यांनी संगीतरत्न दत्ता महाडिक लोकनाट्य तमाशा मंडळाचा फड अतिशय कष्टाने सुरू ठेवला आहे.

अगदी जबाबदारी चालवून लोककला जतन ठेवण्याचे काम केले आहे.वडील कै. संगीतरत्न दत्ता महाडिक यांची गाणी आणि त्यांच्या गाण्याची लकब आजही संजय महाडिक हे हुबेहुब गाणी सादर करून रसिकांची मने खेचतात.

त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन बालगंधर्व परिवार ट्रस्टने त्यांना सन 2024-2025 च्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या कामी संजय महाडिक यांचे अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे सचिव अनिल गुंजाळ, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे शासन समाजभूषण पुरस्कार्थी काशिनाथ आल्हाट ,मिटू पवार, मीरा पुणेकर, मंगरूळ गावचे माजी सरपंच दत्ता लामखडे, बांबोर्डी गावचे सरपंच सुभाष दिवटे पाटील अभिनंदन केले.

## श्री. संत निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी पालखीचे मिरजगावात उत्साहात स्वागत

### विठ्ठल नामाच्या जयघोषाने दुमदुमली मिरजगावनगरी !

कर्जत : (समर्थ गांवकरी)

श्री. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्याचे कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले.

सकळही तीर्थे निवृत्तीच्या पायी, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम.... ज्ञानेश्वर माउली तुकाराम, असा हरिनामाचा गजर करत राज्यभरातील दिंड्या पंढरपूरकडे मार्गक्रमण करत आहेत. टाळ मृदुंगाच्या तालात, हरिनामाच्या गजरात पंढरीची वारी भक्तिरसात न्हाहून निघाली आहे. अशा भक्तिमय वातावरणात संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी नगर जिल्ह्यात असून श्री.संत निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी पालखीचे गुरूवारी दि.२६ जून रोजी मिरजगाव शहरात आगमन होताच या दरम्यान ठिकठिकाणी पालखी रथावर पुष्पवृष्टी करून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी टाळ मृदंग व विठ्ठल नामाच्या जयघोषाने मिरजगाव परिसर दुमदुमून गेले होते. नाथांचे मनोभावे नागरिकांनी दर्शन घेतले.

आषाढी एकादशीनिमित्त श्री.क्षेत्र त्र्यंबकेश्वर ते श्री. क्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या श्री. संत निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्याचे सालाबादप्रमाणे यावर्षीही फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून टाळ मृदुंग व विठ्ठल नामाच्या जयघोषात आगमन झालेल्या या पायी दिंडी सोहळ्यात आलेल्या वारकऱ्यांकरिता मिरजगाव ग्रामपंचायत व कर्जत तालुका प्रशासन, पोलिस विभागाच्या वतीने चांगले नियोजन करण्यात आले होते.

प्रशासनाकडून निर्मलवारी, आरोग्यदायी सारख्या सुविधा दिल्याने वारकऱ्यांची चांगली सोय झाली. शहरात ठिकठिकाणी तरूणांनी तसेच विविध सामाजिक संघटनांनी वारकऱ्यांकरिता चहा, बिस्कीट, पाणी वाटप स्टॉल व मोफत औषधे वाटपाची सोय करण्यात तसेच जि.प.शाळेत वारकऱ्यांना मुक्कामासाठी वॉटरप्रुफ मंडपची व्यवस्था करण्यात आली होती.

पालखी सोहळ्यात पायी दिंडी पालखी प्रमुख हभप नवनाथ महाराज गांगुर्डे, सोमनाथ घुटेकर, हभप मोहन महाराज बेलापूरकर, जयंत गोसावी, अनिल गोसावी, बाळकृष्ण डावरे, माजी अध्यक्षा कांचनताई जगताप, विश्वस्त



नारायण मुटाळे, राहुल महाराज साळुंके यांच्यासह हजारो वारकरी सहभागी झाले आहेत.

या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे स्वागत करण्याकरिता कर्जतचे निवासी नायब तहसिलदार महादेव करांडे, महसूल नायब तहसिलदार प्रितम ठोंबरे, गटविकास अधिकारी रुपचंद जगताप, सहायक पोलिस निरिक्षक विजय झंजाड

मिरजगावच्या सरपंच सुनिता नितिन खेतमाळस, ग्रामविकास अधिकारी विकास हगारे, मंडळाधिकारी बी.के शेळके, जि.प.सदस्य गुलाब तनपुरे, तलाठी दिपक व्यवहारे, आरोग्य अधिकारी दिलीप व्हरकटे, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष डॉ.पंढरीनाथ गोरे, नितिन खेतमाळस, बाजार समितीचे संचालक लहू वतारे, संपत बावडकर, किरण जवणे, सदगुरू उद्योग समुहाचे अध्यक्ष उद्धवशेठ नेवसे, डॉ.विलास कवळे, डॉ.चंद्रकांत कोरडे, दादा बुद्धीवंत, कैलास बोराडे, सारंग घोडेस्वार, संदीप बुद्धीवंत, निवृत्ती जवणे, विजय पवार, हभप राजेंद्र गोरे, शिवाजी नवले, हरिदास केदारी, बबन दळवी, सोमनाथ साबळे, शिवाजी नवले, अच्युत वीर, तानाजी पिसे, सचिन बावडकर, पोपट कोरडे, सागर पवळ, सलिम आतार, बापू घोडके, दत्ता तुपे, शिवाजी गायकवाड, अशोक नवले, मुख्तार सय्यद, अशोक नवले, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सर्व समस्त ग्रामस्थ तसेच पायी दिंडी सोहळा नियोजन समितीचे जयकुमार कोठारी, भाऊसाहेब बावडकर, अंकुश आबा खराडे, रोहिदास यादव, राम बावडकर, संपत शेलार आदीसह ग्रामपंचायत सफाई कामगार महिला भगिनी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते..

मिरजगाव येथे संत निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी पालखीचे मुक्काम असल्याने गावकऱ्यांच्या वतीने वारकऱ्यांना सायंकाळी जेवणाची सोय करण्यात आली होती.

# चोवीस राष्ट्राचे सर्वोच्च नागरी सन्मानासह अनेक अंतरराष्ट्रीय पुरस्कार

### जागतिक नेता : पंतप्रधान नरेंद्र मोदीजी

(समर्थ गांवकरी)

■ संकलन ■
श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील
जिल्हा संयोजक, भाजपा ,सोशल मिडीया सेल, उत्तर नगर जिल्हा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला अकरा वर्ष पूर्ण होत असताना एक जगमान्य नेता म्हणून आपली प्रतिमा तयार केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या नेतृत्वाने भारताला जागतिक स्तरावर एक नवी ओळख तर मिळवून दिलीच, पण जगातील अनेक देशांकडून त्यांना उच्च सन्मान मिळाला आहे. नरेंद्र मोदींना आतापर्यंत अनेक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले आहेत, जे त्यांचे जागतिक महत्त्व आणि प्रभाव दर्शवतात. विश्वगुरू म्हणून मोदीजींना अनेक देशांनी आपले सर्वोच्च सन्मान दिले आहेत. यामध्ये अमेरिका, रशिया, फ्रान्स, सौदी अरेबिया, श्रीलंका, अफगाणिस्तान, UAE यांसारख्या प्रमुख देशांतील प्रतिष्ठित पुरस्कारांचा समावेश आहे. ज्यामुळे ते इतिहासातील सर्वात आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित भारतीय नेते बनले आहेत.

एकेकाळी आपल्या देशाच्या दोन पंतप्रधानानी आपल्या स्वतःच्या कार्यकाळात स्वतः स्वतःची शिफारस करून स्वतःच स्वतःला भारतरत्न पुरस्कारने गौरविले होते. अन आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ११ वर्षा च्या कार्यकाळात आतापर्यंत २४ देशांनी त्यांच्या देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

२०१४ पासून भारताचे १४ वे आणि सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या पुरस्कार, सन्मान आणि मान्यतांची ही एक विस्तृत यादी आहे. २०२५ पर्यंत पंतप्रधान मोदींना परदेशी राष्ट्रांकडून दोन डझन भराहून अधिक नागरी सन्मान मिळाले आहेत,



ज्यामुळे ते इतिहासातील सर्वात आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित भारतीय नेते बनले आहेत. येथे अशा देशांची यादी आहे ज्यांनी त्यांना त्यांच्या सर्वोच्च महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

सौदी अरेबिया (२०१६): अब्दुलअझीझ अल सौदचा आदेश (मुस्लिम नसलेल्या मान्यवरांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान) सौदीचे राजे सलमान यांच्याकडून पंतप्रधान मोदींना ऑर्डर ऑफ किंग अब्दुल अझीझ प्रदान करण्यात आला. अफगाणिस्तान (२०१६): गाझी अमीर अमानुल्ला खानचा राज्य आदेश.

पॅलेस्टाईन (२०१८): पॅलेस्टाईन राज्याचा ग्रँड कॉलर. संयुक्त अरब अमिराती (२०१९): जायदचा आदेश (सर्वोच्च नागरी सन्मान). रशिया (२०१९): सेंट अँड्रयू द अपोस्टलचा आदेश (सर्वोच्च नागरी सन्मान) मालदीव (२०१९): निशान इज्जुद्दीनचा आदेश (विदेशी मान्यवरांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान). बहरीन (२०१९): किंग हमदचा आदेश पुनर्जागरण (तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान). युनायटेड स्टेट्स (२०२०): लीजन ऑफ मेरिट (सर्वोच्च पदवी). भूतान (२०२१ /२०२४ मध्ये प्रदान करण्यात आले): ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो (सर्वोच्च नागरी सन्मान) पंतप्रधान मोदींना भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांच्याकडून ऑर्डर ऑफ द ड्रॅगन किंग प्रदान करण्यात येत आहे. फिजी (२०२३): कम्पेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी (सर्वोच्च नागरी सन्मान). पापुआ न्यू गिनी (२०२३): ग्रँड कम्पेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ लोगोहू (सर्वोच्च नागरी सन्मान). इजिप्त (२०२३): ऑर्डर ऑफ द नाईल (सर्वोच्च नागरी सन्मान). फ्रान्स (२०२३): ग्रँड क्रॉस ऑफ द लीजन ऑफ ऑनर (सर्वोच्च नागरी सन्मान). ग्रीस (२०२३): ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ ऑनर (दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान). पलाऊ (२०२३): अबकाल पुरस्कार (नेतृत्व आणि शहाणपणाचे प्रतीक असलेले एक औपचारिक लाकडी वाद्य). कुवेत (२०२४): ऑर्डर ऑफ मुबारक अल-कबीर, कुवेती अमीर मिशाल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांच्याकडून पंतप्रधान मोदींना ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट प्रदान करण्यात येत आहे. गयाना (२०२४): द ऑर्डर ऑफ उत्कृष्टता, पंतप्रधान मोदींना गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांच्याकडून ऑर्डर ऑफ एक्सलन्स ऑफ गयाना प्रदान करण्यात आला. डोमिनिका (२०२४): डोमिनिका सन्मान पुरस्कार. नायजेरिया (२०२४): "द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर". मॉरिशस (२०२५): द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ स्टार अँड की ऑफ द हिंद महासागर (सर्वोच्च नागरी सन्मान). श्रीलंका (२०२५): द मित्र विभूषण. सायप्रस (२०२५): ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकरियोस III (सर्वोच्च नागरी सन्मान) १६ जून २०२५ रोजी सायप्रसने नवीनतम सन्मान प्रदान केला.

याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय संस्थांनी पंतप्रधान मोदींना दिलेले इतर प्रतिष्ठित पुरस्कार: सर्वोच्च नागरी सन्मानांव्यतिरिक्त, पंतप्रधान मोदींना प्रसिद्ध जागतिक संघटनांकडून अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. २०१८ मध्ये, जागतिक सुसंवाद आणि जागतिक शांततेसाठी त्यांच्या योगदानाबद्दल, त्यांना सोल पीस प्राइज कल्चरल फाउंडेशनने सोल पीस प्राइज प्रदान केले.

त्याच वर्षी, संयुक्त राष्ट्रांनी पंतप्रधान मोदींना त्यांच्या धाडसी पर्यावरणीय नेतृत्वासाठी त्यांचा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार, चॅम्पियन्स ऑफ द अर्थ पुरस्कार देऊन सन्मानित केले. २०१९ मध्ये, पंतप्रधान मोदींना पहिला फिलिप कोटलर प्रेसिडेंशियल पुरस्कार मिळाला, जो दरवर्षी उत्कृष्ट राष्ट्रीय नेतृत्व दाखवणाऱ्या नेत्यांना दिला जातो.

भारताच्या स्वच्छ भारत अभियानाला स्वच्छतेच्या जनचळवळीत रूपांतरित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना मान्यता देण्यासाठी बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनने २०१९ मध्ये पंतप्रधान मोदींना ग्लोबल गोलकीपर पुरस्काराने सन्मानित केले. २०२१ मध्ये, पंतप्रधान मोदींना केंब्रिज एनर्जी रिसर्च असोसिएट्स (CERA) कडून जागतिक ऊर्जा आणि पर्यावरणीय शाश्वततेवरील त्यांच्या नेतृत्वाची दखल घेऊन ग्लोबल एनर्जी अँड एन्व्हायर्नमेंट लीडरशिप अवॉर्ड मिळाला.

यादीत काही अधिक लहान किंवा विशिष्ट पुरस्कारांचा समावेश असू शकतो, परंतु हे पंतप्रधान मोदींना मिळालेले प्रमुख आंतरराष्ट्रीय सन्मान आहेत.

पंतप्रधान मोदींना मिळालेल्या नागरी सन्मानांची संख्या विक्रमी २४ वर पोहोचली आहे, ज्यामुळे त्यांचे नेतृत्व आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा अधोरेखित होते. विश्लेषकांचे मत आहे की हे भारताच्या मजबूत राजनैतिक संबंधांचे आणि देशाच्या वाढत्या प्रभावाचे प्रतिबिंब देखील आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)